# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/04/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. रामटेक :— यातील फिर्यादी नामे— सचिन लक्ष्मीकांत संगीतराय, वय २७ वर्ष, रा. अंबाळा ता. रामटेक यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे अप. क्र. १२२/२०१९ कलम ३०२, २०१ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील मृतक महिला नामे— कमलाबाई पतिराम ढोंगे ही **आरोपी नामे— प्रमोद पतीराम ढोंगे, वय ३० वर्ष, रा. अंबाळा ता. रामटेक** याची आई असुन दोघेच घरी राहत होते. आरोपी हा दारू पिण्याच्या सवयीचा असुन नेहमी मृतक हिला पैशाच्या व जेवणाच्या कारणावरून मारहाण करायचा. यातील आरोपीने आपल्या आईला दारू पिण्यासाठी पैसे का देत नाही या कारणावरून आरोपीने मृतक आईला कुऱ्हाडीने मारून जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस उपनिरीक्षक राजु मृत्युपोड पोस्टे रामटेक यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २१/०४/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. देशमुख सा. यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भांदवि मध्ये आजीवन कारावास व ५०००/—रू. दंड दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे. सरकारचे वतीने एपीपी नेवारे मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोशि/२२२९ संदीप सहारे पोस्टे रामटेक यांनी मदत केली आहे.

## घरफोडी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मोरारजी कंपनी समोर येथे दिनांक १९/०४/२०२३ चे १९.०० वा. ते दिनांक २०/०४/२०२३ चे ०६.०० वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— मनोज विठठलराव मेंढे, वय ३८ वर्षे, रा. टेंभरी ता. हिंगणा जि. नागपुर हे आपले चहा नास्त्याचे दुकान बंद करून आपले घरी आले व सकाळी ०६.०० वा. दुकान उघडण्याकरीता गेले असता फिर्यादीचे दुकानाचे समोरचा पल्ला उघडलेला दिसला व समोरून लागलेले दोन्ही लॉक तोडलेले दिसले असता फिर्यादीची दुकाणाची पाहणी केली असता त्यामध्ये ०२ सिलेंडर भारत गॅस कंपनीचे किंमती अंदाजे ३०००/— रू. व ०१ एक्साईड कंपनीची बॅटरी किंमती अंदाजे १०००/—रू. असा एकुण ४०००/— रू. किंमतीचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयानी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास नापोशि राजेंद्र तायडे ब.नं.२०२५ एमआयडीसीबोरी मो.नं ७३५०५३२२५ हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील ढिवरवाडी येथे दिनांक १९/०४/२०२३ चे २२.०० वा. ते २२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– रूपेश सुखदेव चोपडे, वय ३५ वर्ष रा. ढिवरवाडी काटोल हे आपले घरासमोर उभे असताना दोन्ही **आरोपी नामे– १) अजय वरगट २) कैलास वरगट दोन्ही रा. ढिवरवाडी** हे जवळ आले व म्हणाले की, तु ज्या ठिकाणी राहत आहे ती जागा अतिक्रमण मध्ये आहे. तुझा या जागेवर कोणताही हक्क नाही. असे म्हटले असता त्यावर फिर्यादीने त्याला म्हटले की, तुझी पण जागा अतिक्रमण मध्ये आहे. मी कशाला खाली करू तु कर. असे म्हटले असता आरोपी क्र. १ यांनी फिर्यादीला हातबुक्याने मारपीट केली व आ क्र. २ यांनी तेथे पडलेल्या काडीने डोक्यावर मारले त्यामुळे रक्त निघाले, त्यावेळी फिर्यादीची पत्नी झगडा भांडण सोडविणेकरीता मध्यस्थी आली असता तिला सुद्धा ढकलढुकल केले व शिवीगाळ करून फिर्यादी व त्याचे पत्नीला जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ. १६४६ लक्ष्मण रूडे पोस्टे काटोल मो नं ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील न्यु वस्ती रानबोडी गाव शिवार येथे दिनांक १९/०४/२०२३ चे २२.०० वा. २२.३० वा. सुमारास महेंद्रा पिकअप बुलेरो क्र. एम. एच.– ४० वाय –१८८९ चा चालक **आरोपी नामे– विशाल राजु अरबट, रा. डोंगरगाव** याने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरून येणारी एम. एच.– ४० सि. एम.– २२८९ चा चालक नामे– **मनिष रमेश चव्हाण** हा भिवापुर कडुन उमरेड मार्गे येत असतांना यातील आरोपीने समोरून धडक मारले ज्यामुळे वाहनात बसलेला मनिष रमेश चव्हाण हा गंभिर जखमी झाला असुन आरोपीसोबत असेलेले नान सखाराम काकडे हा अपघातात जखमी होवुन मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा. आशिश खोडे ब. नं. ८२८ पोस्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ अ भादंवि. सहक १३४, १७७ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि प्रशांत खोंब्रागडे ८८८८८१७१८३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**